# मंत्रिमंडळ निर्णय

## १७ फेब्रुवारी २०१० (सह्याद्री)

१. क्रीडांगण आणि पाणी पुरवठा प्रकल्पाच्या उदंचन केंद्रासाठी आरक्षण फेरबदलास मान्यता.

२. मुंबई मोटार वाहन कर अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता.

३. नवीन पोलीस प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास मान्यता.

४. राज्य जैवविविधता नियमात सुधारणा.

५. कृषी विद्यापीठांना ६ वा वेतन आयोग लागू.

६. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाला ५ वा वेतन आयोग लागू.

**********

# क्रीडांगण आणि पाणी पुरवठा प्रकल्पाच्या उदंचन केंद्रासाठी आरक्षण फेरबदलास मान्यता

बृहन्मुंबई शहरातील आर (दक्षिण) विभागातील नगर भूमापन क्र.१२८ अे/५९/१ मौजे कांदिवली या ४२२९०.६० चौ.मी. ``क्रीडांगणासाठी`` राखीव असलेल्या जागेमधील २३३२.०० चौ.मी. जागा ``क्रीडांगणासह महानगरपालिका पाणी पुरवठा प्रकल्पाचे उदंचन केंद्र`` यासाठी आरक्षण फेरबदल करणेचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेने शासनास मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्यासाठी महानगरपालिकेने ठराव क्र.५७३, दि.१८/९/२००८ मंजूर केलेला आहे.

ही संपूर्ण जमीन क्रीडांगणासाठी आरक्षित आहे. हे क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. पी आणि आर विभागातील पाण्याची तीव्र कमतरता कमी करण्यासाठी तिथे उदंचन केंद्र बांधण्यासाठी महानगरपालिकेचा प्रस्ताव आहे. भौगोलिक सर्वेक्षण आणि भौगोलिक तांत्रिक तपासणीनंतर या जमिनीपैकी २३३२ चौ.मी. क्षेत्रफळाच्या जमिनीवर पाणी पुरवठ्याचा भुयारी वापर व नियंत्रण कक्ष बांधण्यात आला असून त्याचा वापर सुरु आहे.

नियमावलीतील नियम क्रमांक ११ (३) अन्वये शासनाच्या पूर्व मंजुरीने, सार्वजनिक वापरासाठी आरक्षित असलेली जमीन / इमारत अन्य सार्वजनिक वापरासाठी वापरता येऊ शकते. त्यामध्ये दुसरा वापर हा त्या जमिनीच्या वापराशी व नियमाशी सुसंगत असला पाहिजे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सादर केलेला प्रस्ताव हा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाचा आहे. या प्रस्तावामुळे शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. त्यामुळे बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ११ (३) मधील तरतुदीनुसार या २३३२.०० चौ. मी. क्षेत्राच्या जमिनीच्या वापरात ``क्रीडांगणासह महानगरपालिका पाणी पुरवठा प्रकल्पाचे उदंचन केंद्र`` या फेरबदल प्रस्तावास बृहन्मुंबई महानगरपालिकेने या प्रकल्पासाठी पर्यायी जागा पहावी. अशी पर्यायी जागा उपलब्ध होत नसल्यास बृहन्मुंबईच्या या प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता देण्यात आली आहे.

-----------

# मुंबई मोटार वाहन कर अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता

मुंबई मोटार वाहन कर अधिनियमात १९५८ मधील पहिल्या अनुसूची-१ मधील अनुसार पहिल्या परिशिष्टातील इतर परिच्छेदांतर्गत वाहन कर लागू नसेल अशा सर्व वाहनांना अनुसूची- सात-अ नुसार कर लागू होतो. उदा. कोणताही परवाना नसणारी परिवहन संवर्गात नोंदणी झालेली व मोटार वाहन अधिनियम १९८८ कलम-८८(८) अन्वये विशेष परवाना घेऊन व्यवसाय करणाऱ्या बसेस, वाहने, ड्रायव्हींग ट्रेनिंग स्कूल परीक्षा देण्यासाठी वापरली जाणारी वाहने, बाहेरील राज्यातील कार, जीप इ. अल्पकालावधीसाठी येणाऱ्या वाहनांना या संवर्गानुसार कर आकारणी केली जाते.

इतर संवर्गातील वाहनांच्या कराच्या दरामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. परंतु अनुसूची-सात अ च्या दरामध्ये यामध्ये १ डिसेंबर १९९७ नंतर सुधारणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे इतर कराच्या दराशी सुसंगत राहण्याच्या दृष्टीने या संवर्गातील कराचे दर बदलणे आवश्यक आहे. या परिच्छेदातील विहित केलेले दर हे महत्तम दरापर्यंत पोहोचले आहेत. त्यामुळे वाढीव कर लावण्यासाठी व अनुसूची एक मधील अ-सात मध्ये सहजता व सुसूत्रता आणण्यासाठी या संवर्गातील वर्गीकरणात बदल करणे आवश्यक आहे. त्यानसार या परिच्छेदातील आताच्या प्रचलित तरतुदीत व वर्गीकरणामध्ये बदल करून नवीन नवीन महत्तम(Maximum) व न्यूनतम (Minimum) कर आकरणी करण्याची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ज्याचे भाररहित वजन ७५० कि.ग्रॅ.पेक्षा अधिक नाही अशी वाहने - प्रस्तावित कराचा दर ८०० रुपये, ज्यांचे भाररहित वजन ७५० कि.ग्रॅ. पेक्षा अधिक असेल अशी वाहने १२०० रुपये. चालक वगळता ६ पेक्षा अधिक परंतु जास्तीत जास्त १२ उतारू वाहून नेण्याची परवानगी दिलेल्या वाहनाच्या प्रत्येक उतारुसाठी १५०० रुपये, चालक वगळता बारापेक्षा अधिक व २४ पेक्षा कमी उतारू वाहून नेण्याची परवानगी दिलेल्या वाहनाच्या प्रत्येक उतारुसाठी १७०० रुपये तसेच २४ पेक्षा अधिक उतारु वाहून नेण्याची परवानगी दिलेल्या वाहनांच्या प्रत्येक उतारुसाठी १९०० रुपये.

-----------

# नवीन पोलीस प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास मान्यता

तासगाव (जि.सांगली) आणि धुळे येथे पोलीस प्रशिक्षण विद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.

तासगाव पोलीस प्रशिक्षण विद्यालयासाठी बांधकामाच्या अंदाजित खर्चासाठी ४६ कोटी ४० लाख रुपये इतक्या रकमेस आणि बांधकाम पूर्ण होत आले असल्याने साधनसामुग्री/प्रशिक्षण साहित्य खरेदीसाठी २ कोटी ३४ लाख १२ हजार ७८९ रुपये इतक्या रकमेस मान्यता देण्यात आली.

धुळे पोलीस प्रशिक्षण विद्यालयाच्या बांधकामासाठी केलेल्या १ कोटी २० लाख रुपये खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात आली.

याशिवाय पोलीस प्रशिक्षण केंद्र, वरणगांव (जि.जळगाव) व पांढरकवडा (जि.यवतमाळ) तसेच नांदेड येथे नवीन प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी तत्वतः मान्यता देण्यात आली.

पोलीस विभागातील विविध संवर्गात सन २००६ पासून ५५,१०५ इतकी पदे ५ टप्प्यात निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. आतापर्यंत ४ टप्प्यात सुमारे ४३६१२ इतकी पदी निर्माण करण्यात आलेली आहेत. या नवीन निर्माण केलेल्या पदांवरील तसेच सेवानिवृत्त, पदावनती इत्यादी कारणामुळे रिक्त होणाऱ्या पदावर पोलीस शिपायांची मोठ्या प्रमाणात भरती करण्यात येते. नवीन भरती केलेल्या पोलीस शिपायांना ९ महिन्याचे मूलभूत प्रशिक्षण देण्यासाठी सध्या राजयात अस्तित्वात असलेल्या ८ पोलीस प्रशिक्षण केंद्रात ४ हजार प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याची सोय आहे. ती पुरेशी नसल्याने नवीन प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येत आहेत.

सध्या महाराष्ट्रात मरोळ, खंडाळा, नानवीज, जालना, नागपूर, अकोला, सोलापूर, बाभळगाव या ठिकाणी पोलीस प्रशिक्षण विद्यालय सुरु आहेत.

--------

## राज्य जैवविविधता नियमात सुधारणा

महाराष्ट्र राज्य जैवविविधता नियम, २००८ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

या सुधारणेनुसार महाराष्ट्र जैवविविधता मंडळाच्या पहिल्या अध्यक्ष पदाकरिता सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी निवडीचा आवाका अधिक विस्तृत करणे आवश्यक आहे. त्यामुळे वयाची ६५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर देखील वयाच्या ७० वर्षापर्यंत एक विशेष बाब म्हणून नियुक्तीचा अधिकार राज्य शासनास असेल. महाराष्ट्र जैवविविधता मंडळाच्या अध्यक्ष पदावरील व्यक्ती किमान विज्ञान शाखेतील पदवीधर असेल. महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे मुख्यालय मुंबई ऐवजी नागपूर येथे असेल.

जैवविविधता अधिनियम, २००२ अन्वये तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य जैवविविधता नियम, २००८ मधील तरतुदीनुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय शोध समितीच्या शिफारशीनुसार या नियमामध्ये सुधारणा करण्यात येत आहेत.

------------

## कृषी विद्यापीठांना ६ वा वेतन आयोग लागू

केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे राज्यातील कृषी विद्यापीठे व कृषी महाविद्यालये यामधील शिक्षक व इतर समकक्ष पदांच्या वेतनश्रेण्या दिनांक १ जानेवारी २००६ पासून सुधारण्याचे तत्वत: मान्य करण्यात आले.

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये व विद्यालयातील शिक्षक व इतर समकक्ष पदांना ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेतील वेतनश्रेण्या, महागाई भत्ता व अन्य विविध भत्ते तसेच सेवा सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याच धर्तीवर कृषी विभागांतर्गत असलेल्या राज्यातील कृषी विद्यापीठे, कृषी महाविद्यालये येथील शिक्षक व समकक्ष पदांना ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन संरचना लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

यासाठी १ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २०१० या कालावधीतील अतिरिक्त भार रु.१७६.३४ कोटी एवढा येणार आहे. त्यापैकी रु.१४१.०७ कोटी निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध होणार आहे. उर्वरित २० टक्के हिश्श्यापोटी रु.३५.२७ कोटीचा अंदाजे आर्थिक भार राज्य शासनावर पडणार आहे. दि. ३१ मार्च २०१० नंतरचा वार्षिक अतिरिक्त आवर्ती खर्च अंदाजे रु.४३.५४ कोटी येणार आहे.

-----------

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाला ५ वा वेतन आयोग लागू

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग १ एप्रिल २००४ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

या ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी मान्य केल्याने येणारी थकबाकीपोटी रक्कम रु.१५२.४४ लाख इतकी आणि वार्षिक भार रु.३०.४९ राहील. हा खर्च शासनाकडून सहाय्यक अनुदानातून भागविण्यात येईल.

हा वेतन आयोग १ एप्रिल २००४ पासून लागू करण्यात येईल.

-----o-----